## एसबीआय लाइफ - स्मार्ट ॲन्युईटी प्लस का?

एसबीआय लाइफ – स्मार्ट ॲन्युईटी प्लस, ह्या इंडिविज्युअल, नॉन–लिंक्ड, नॉन–पार्टिसिपेटिंग, जनरल ॲन्युईटी प्रॉडक्ट आहे जो नॅशनल पेन्शन सिस्टिम (एनपीएस) सबस्क्रायबर्सना त्या योजनेतून बाहेर पडताना उपलब्ध असतो. हा प्लॅन सबस्क्रायबरला त्याच्या/तिच्या जीवनभर ॲन्युईटीच्या स्वरूपात (ज्याला साधारणपणे पेन्शन अस म्हटलं जातं) नियमित उत्पन्न पुरवतो.

## प्लॅनचे तपशील

| | | |
|---|---|---|
| **प्रवेशाचं वय*** | **किमान :** 18 वर्षे | **कमाल :** 95 वर्षे |
| | कृपया दखल घ्या : जॉइंट लाइफ ॲन्युईटी पर्यायासाठी प्राथमिक आणि दुय्यम ॲन्युइटंट्स मधील वयाचा फरक कमाल 30 वर्षे असण्याला अनुमती आहे. | |
| **प्रीमियमची रक्कम** | • ॲन्युईटीच्या खरेदीसाठी उपलब्ध असलेल्या तुमच्या एनपीएस निधीच्या एवढी.<br>• हे मूल्य ह्या दरम्यान असावे :<br>  • निर्गमनाच्या वेळी असलेल्या तुमच्या एनपीएस निधीच्या 40% - 100%<br>  (सेवानिवृत्ती, सुपरॲन्युएशन किंवा एनपीएस अकाउंटची मुदतपूर्ती ह्यामुळे निर्गमन केले असल्यास)<br>  • निर्गमनाच्या वेळी असलेल्या तुमच्या एनपीएस निधीच्या 80% - 100%<br>  (राजीनामा, ऐच्छिक सेवानिवृत्ती किंवा एनपीएस अकाउंटची मुदतपूर्व समाप्ती ह्यामुळे निर्गमन केले असल्यास) | |
| **ॲन्युईटी पेआउट पद्धत** | मासिक/तिमाही/सहामाही/वार्षिक<br>कृपया दखल घ्या : PFRDAच्या नियमांनुसार सरकारी क्षेत्रातील सबस्क्रायबर्सना ॲन्युईटी पेआउट फक्त मासिक धर्तीवरच केले जातील. | |

**वयासंबंधीचे सर्व संदर्भ हे मागील वाढदिवसाचे वय आहेत.*
*विद्यमान PFRDA मार्गदर्शन प्रणालीच्या अनुसार एनपीएस सबस्क्रायबर्सच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी प्रवेशाच्या सर्वात कमी व सर्वात जास्त वयाला अनुमती दिली जाईल.*

## ॲन्युईटी पर्याय/स्कीम्स उपलब्ध

खाली उल्लेखलेले ॲन्युईटी पर्याय हे PFRDA नियमनांमध्ये निर्दिष्ट केलेल्या नियमांच्या आधारे उपलब्ध आहेत आणि PFRDA नियमनांमध्ये बदल झाल्यास ते बदलू शकतात.

| पैसे काढण्याचा प्रकार | ॲन्युईटी पर्याय उपलब्ध | एएसपी स्कीम आयडी |
|---|---|---|
| **सरकारी क्षेत्र :** मुदतपूर्व/लवकर निर्गमन/राजीनामा/व्हीआरएस | एनपीएस – फॅमिली इन्कम | AS001005 |
| **सर्व क्षेत्रे :** (सरकारी सह) सुपरॲन्युएशन/अन्य कोणतेही | एनपीएस – फॅमिली इन्कम | AS001005 |
| | लाइफ ॲन्युईटी | AS001001 |
| | लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस | AS001002 |
| | लाइफ अँड लास्ट सर्व्हायवर विथ 100% ॲन्युईटी | AS001003 |
| | लाइफ अँड लास्ट सर्व्हायवर 100% ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस | AS001004 |

| सामाइक उदाहरण – एनपीएस सबस्क्रायबर्ससाठी मंथली पेआउट | | | | |
|---|---|---|---|---|
| **लाइफचा प्रकार** | **ॲन्युईटी पर्याय @ वय 60 वर्षे/एनपीएस फंड्स (INR मध्ये)** | **5,00,000** | **10,00,000** | **15,00,000** |
| सिंगल लाइफ | पर्याय 1.1 : लाइफ ॲन्युईटी | 3,113 | 6,247 | 9,370 |
| | पर्याय 1.2 : लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस | 2,500 | 5,022 | 7,533 |
| जॉइंट लाइफ | पर्याय 2.1 : लाइफ अँड लास्ट सर्व्हायवर विथ 100% ॲन्युईटी | 2,816 | 5,654 | 8,481 |
| | पर्याय 2.2 : लाइफ अँड लास्ट सर्व्हायवर 100% ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस | 2,490 | 5,002 | 7,503 |
| सिंगल लाइफ | पर्याय 2.4 : एनपीएस – फॅमिली इन्कम | 2,500 | 5,022 | 7,533 |
| जॉइंट लाइफ | | 2,490 | 5,022 | 7,533 |

*कृपया दखल घ्या : दोन्ही ॲन्युईटंट्स समान वयाचे असल्याचे समजून जॉइंट लाइफ ॲन्युईटी पर्यायासाठी*

## लाभ

1. **एनपीएस – फॅमिली इन्कम (पर्याय 2.4) :**

   **ह्या पर्यायाअंतर्गत, ॲन्युईटी लाभ हे PFRDA द्वारा निर्दिष्ट नियमनांच्या अनुसार देय रहातील.**

   विद्यमान नियमनांच्या अनुसार, ॲन्युईटी लाभ हे सबस्क्रायबरच्या आणि त्याच्या/तिच्या वैवाहिक जोडीदाराच्या जीवनासाठी ''लाइफ अँड लास्ट सर्व्हायवर – 100% ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस'' ह्या ॲन्युईटी पर्यायाच्या अनुसार देय रहातील. सबस्क्रायबरला वैवाहिक जोडीदार नसल्यास, ॲन्युईटी लाभ हे ''लाइफटाइम ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस'' ह्या ॲन्युईटी पर्यायाच्या अनुसार सबस्क्रायबरच्या हयातभर देय रहातील. ॲन्युईटी निहित होण्याआधी सबस्क्रायबरचे निधन झाल्यास ॲन्युईटी लाभ हे ''लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस'' ह्या ॲन्युईटी पर्यायाच्या अनुसार वैवाहिक जोडीदाराला हयातभर देय राहातील.

   ॲन्युईटंट्सच्या निधनानंतर, ॲन्युईटीची रक्कम मिळणे बंद होईल आणि खरेदीच्या किंमतीच्या परताव्याचा विनियोग हा (कुणी असल्यास) अवलंबून असलेल्या हयात पालकांसाठी खाली निर्देशित केलेल्या क्रमानुसार नवीन ॲन्युईटी कॉंट्रॅक्ट खरेदी करण्याकरिता केला जाईल :

   अ) निधन झालेल्या सबस्क्रायबरवर अवलंबून असलेली त्याची हयात आई;

   ब) निधन झालेल्या सबस्क्रायबरचे जिवंत अवलंबून असलेले वडील.

   तथापि, ॲन्युईटीची रक्कम सुधारित केली जाऊ शकेल आणि ही रक्कम ॲन्युईटी कॉंट्रॅक्टच्या अंतर्गत नामनिर्देशित व्यक्तीला परत करण्यासाठी आवश्यक त्या प्रीमियमच्या विनियोगाद्वारे अशा ॲन्युईटीच्या खरेदीच्या वेळी असलेला प्रचलित ॲन्युईटी दर वापरून ''लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस'' ॲन्युईटी पर्यायाच्या अनुसार ठरवली जाईल.

   वर निर्देशित केलेल्या क्रमाने सर्व सदस्यांना विमाछत्र मिळेपर्यंत ॲन्युईटी मिळणे सुरूच राहील. अशा सर्व कुटुंबीयांना विमाछत्र लाभल्यानंतर प्रीमियमची रक्कम लागू असेल त्यानुसार सबस्क्रायबरच्या हयात असलेल्या मुलांना आणि मुलं नसतील तर एनपीएस सबस्क्रायबरच्या कायदेशीर वारसांना दिली जाईल. हयात असलेल्या शेवटच्या सदस्याच्या निधनानंतर, नामनिर्देशित व्यक्तीला प्रीमियम रिफंड केला जाईल.

   *कृपया दखल घ्या : ह्या पॉलिसीमध्ये खरेदीची किंमत म्हणजे प्रीमियम धरली जाईल, प्रीमियमची रक्कम ही ॲन्युईटी कॉंट्रॅक्ट जारी करताना/नव्याने जारी करताना भरावयाचे लागू कर वगळता आहे.*

2. **सिंगल लाइफ ॲन्युईटी पर्यायासाठी :**
   - लाइफ ॲन्युईटी (पर्याय 1.1)
   - लाइफ ॲन्युईटी विथ रीटर्न ऑफ परचेस प्राइस (पर्याय 1.2)

3. **जॉइंट लाइफ ॲन्युईटी पर्यायासाठी :**
   - लाइफ अँड लास्ट सर्व्हायवर विथ 100% ॲन्युईटी (पर्याय 2.1)
   - लाइफ अँड लास्ट सर्व्हायवर 100% ॲन्युईटी विथ (पर्याय 2.2)

## खालील अटी आणि शर्तींची नोंद घ्यावी

- सरकारी क्षेत्रातील सबस्क्रायबर्सना ॲन्युईटी पेआउट्स (निवडलेला ॲन्युईटी ऑप्शन कोणताही असो) PFRDA नियमनांच्या आदेशाच्या अनुसार केवळ मासिक धर्तीवरच केली जातील.
- एनपीएस – फॅमिली इन्कम हे डिफॉल्ट ॲन्युईटी पेआउट ऑप्शन असेल. तथापि, सबस्क्रायबरला उपलब्ध असलेल्या अन्य कोणत्याही ॲन्युईटी पर्यायामधून निवड करण्याची लवचिकता राहील.
- हा ॲन्युईटी प्लॅन एनपीएस अकाउंट मधील निधीचा विनियोग करून खरेदी करता येऊ शकेल.

## माझं पेन्शनचं उत्पन्न मिळायला मी सुरुवात कशी करावी?

- तुमचे ॲन्युईटी सर्विस प्रोवायडर (एएसपी) आणि एएसपी स्कीम ह्यांचे निर्देशन करून तुमची एनपीएस विथड्रॉअल रिक्वेस्ट 'सेंट्रल रेकॉर्ड कीपिंग एजन्सी (सीआरए) कडे दाखल करा.
- पॉलिसी जारी करण्यासाठी दस्तैवज तुमच्या एएसपी कडे दाखल करा.
- सीआरए कडून निधी मिळाल्यावर तुमची ॲन्युईटी पॉलिसी जारी करण्यात येईल. ॲन्युईटी इन्स्टॉलमेंट्स हे तुमची इमिजिएट ॲन्युईटी पॉलिसी जारी केल्याच्या तारखेपासून एक महिन्यानंतर सुरू होतील.

## एसबीआय लाइफ – स्मार्ट ॲन्युईटी प्लससाठी दाखल करायचे दस्तावेज

- पूर्ण भरलेला सामाइक प्रपोजल फॉर्म – ॲन्युईटी प्रॉडक्ट
- रीतसर भरलेला एफएटीसीए/सीआरएस/सी–केवायसी डिक्लरेशन फॉर्म
- वयाचा पुरावा
- ओळखीचा पुरावा
- निवासाचा पुरावा
- पॅन कार्ड कॉपी किंवा फॉर्म 60
- उपलब्ध असल्यास, एनपीएस सबस्क्रायबरच्या पीआरएएनची कॉपी
- कॅन्सल्ड केलेला चेक किंवा बँक पासबुक किंवा बँक ॲन्युईटी स्टेटमेंट
  (तुम्हाला तुमच्या ज्या अकाउंटमध्ये ॲन्युईटीची रक्कम मिळायला हवी आहे त्याचे तपशील कृपया पुरवा)
- एनपीएस सबस्क्रायबरचा पासपोर्ट साइझ फोटोग्राफ
- दुसऱ्या ॲन्युइटंटच्या परिचय आणि पत्त्याच्या पुराव्याच्या प्रती (जॉइंट लाइफ पर्यायासाठी)
  कृपया स्वयं प्रमाणित फोटो कॉपीज दाखल करा.

## सवलतीस प्रतिबंध

**वेळोवेळी सुधारणा केलेल्या विमा अधिनियम 1938चे कलम 41 असे नमूद करते की :**

क) भारतातील जीवन वा मालमत्ता ह्यांच्याशी संबंधित कोणत्याही जोखमीच्या संदर्भात विमा घेण्यासाठी वा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी वा तो सुरू ठेवण्यासाठी कुणीही व्यक्ती विमाप्रदात्याद्वारे प्रकाशित केलेल्या माहिती पत्रक किंवा तक्त्यानुसार अनुमती देण्यात असलेली सूट वगळता, तिला देय असलेल्या पूर्ण वा अंशत: कमिशनची कोणतीही सूट कुणाही व्यक्तीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आमिष स्वरूपात देऊ शकत नाही व देण्याची ऑफर दाखवू शकत नाही किंवा पॉलिसी घेणारी वा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरू ठेवणारी कुणीही व्यक्ती कोणतीही सूट स्वीकारूही शकत नाही.

ख) ह्या विभागाच्या तरतुदींची पूर्तता करण्यामध्ये कुणाही व्यक्तीने हयगय केल्यास त्याला/तिला दंड होऊ शकतो, ज्याची रक्कम दहा लाखांपर्यंत विस्तारित होऊ शकते.

**Toll-free No.:** 1800 267 9090 | SMS **'LIBERATE'** to 56161 | **Email:** npsannuity@sbilife.co.in | **Web:** www.sbilife.co.in
(Between 9.00 am & 9.00 pm)

एसबीआय लाइफ – स्मार्ट ॲन्युईटी प्लस, हे एक इंडिविज्युअल, नॉन–लिंक्ड, नॉन–पार्टिसिपेटिंग, जनरल ॲन्युईटी उत्पादन आहे.

**बनावट फोन कॉल्स आणि खोट्यानाट्या/फसव्या ऑफर्सपासून सावधान :**
विमा पॉलिसींची विक्री, बोनसची घोषणा किंवा प्रीमियमची गुंतवणूक यासारख्या उपक्रमांमध्ये IRDAI सहभागी नाही. ज्या लोकांना अशा प्रकारचे फोन कॉल्स येतील त्यांना पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची विनंती करण्यात येते.

विक्री व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी जोखमीचे घटक, अटी आणि शर्ती यांच्या अधिक तपशीलांसाठी कृपया विक्री माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचा. ॲन्युईटी बेनिफिट्स हे आणि ॲन्युईटंटने निवडलेले ॲन्युईटी पर्याय आणि ॲन्युईटी भरण्याची पद्धत ह्यावर अवलंबून असतील आणि ॲन्युईटीच्या खरेदीच्या वेळी असलेले प्रचलित ॲन्युईटी दर, ॲन्युईटंट्स द्वारा चुकते केले जातील. वर प्रदर्शित ट्रेड लोगो स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मालकीचा आहे व परवान्याअंतर्गत एसबीआय लाइफद्वारे वापरला गेला आहे. एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय : नटराज, एम. व्ही. रोड आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जंक्शन, अंधेरी (पूर्व), मुंबई–400 069. **IRDAI रजिस्ट्रेशन नं. 111** | CIN : L99999MH2000PLC129113.
2W/NPS/ver1/07/22/SP/MAR